# THE COASTAL REGULATION ZONE (CRZ) NOTIFICATION 2011

A primer for coastal fishing communities (Draft)

in Marathi



June 2011

# किनारपट्टी नियमन क्षेत्र (सी आर झेड) अधिसूचना 2011
# मासेमारी समुदायांसाठी एक प्राथमिक पुस्तिका

**प्रस्तावना**

जयराम रमेश, राज्य पर्यावरण व वनमंत्री यांनी दिनांक 06 जानेवारी 2011 रोजी किनारपट्टी नियमन क्षेत्र (सी.आर.झेड.) अधिसूचना 2011 (भारत सरकार) जाहीर केली. या अधिसुचनेमुळे किनारपट्टी नियमन क्षेत्र (सी.आर.झेड.) अधिसूचना 1991 या अधिसुचनेच्या सुधारणेबाबतची अनेक वर्षे चाललेली विचार विनिमयाची प्रक्रिया एकदाची संपली. या प्रक्रियेने मासेमारी समुदायांमध्ये व पर्यावरण गटांमध्ये खूप मोठ्या आशा जागविल्या होत्या.

ही प्राथमिक पुस्तिका मासेमारी समुदायांमध्ये व आधार संस्थांमध्ये 2011 अधिसुचनेतील मुद्यांबाबत, मासेमारी समुदायांच्या संस्थांना सतत काळजी वाटणारे मुद्दे आणि किनारपट्टींवरील पर्यावरणाच्या संरक्षणातील त्यांची भूमिका या विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी बनवण्यात आली आहे.

या पुस्तिकेच्या भाग 1 मध्ये अधिसुचनेचा मसुदा, मासेमारी समुदायांच्या हिताच्या व त्यांच्या विरूद्धच्या तरतुदी आणि मासेमारी समुदाय निर्णय प्रक्रियेमध्ये, देखरेखीमध्ये व अंमलबजावणीमध्ये कोणती महत्वाची भूमिका बजावू शकतात व कोणती भूमिका त्यांनी पार पाडावी याविषयी माहिती दिलेली आहे.

या पुस्तिकेच्या भाग 2 मध्ये (यावर अजुनही काम सुरू आहे) 2011 अधिसूचनेमधील विषय व तरतुदी सोप्या पद्धतीत सांगितलेल्या आहेत.

# भाग 1

## 1. किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचना 2011 काय आहे?

भारत सरकारद्वारे पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986 च्या नुसार जाहीर केलेल्या किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचना 2011 या अधिसुचनेखाली देशातील किनारपट्टी व 12 मैल सीमेपर्यंतचे जल क्षेत्र (व पाणलोट क्षेत्र) तसेच भरतीच्या प्रभावाखालील जल क्षेत्र येत असून या सर्व क्षेत्राला किनारपट्टी नियमन क्षेत्र मानले गेले आहे आणि ही अधिसूचना या क्षेत्रातील उद्योगांवर व प्रक्रियांवर निर्बंध लादते.

आता किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचना 1991 च्या जागी किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचना 2011 आलेली आहे. 2011 अधिसुचनेत 1991 अधिसुचनेच्या सर्व 25 सुधारणा समाविष्ट केलेल्या असून यापैकी बऱ्याचशा सुधारणा 1991 अधिसुचनेला सौम्य करणाऱ्या होत्या. म्हणूनच सी.आर.झेड. 2011 ही भारतीय किनारपट्टीची सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने एक पाऊल मागेच आहे.

या अधिसुचनेची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेतः

- मासेमारी समुदायांच्या व किनापट्टींवर रहाणाऱ्या इतर स्थानिक समुदायांच्या उपजिविकेच्या सुरक्षिततेची हमी घेणे;
- किनापट्टी क्षेत्र, तेथील अद्वितीय पर्यावरण व तेथील सामुद्रीय क्षेत्राचे संवर्धन व संरक्षण आणि;
- किनापट्टींवरील नैसर्गिक धोके व जागतिक उष्ण्यामुळे वाढणारी समुद्र पातळी ध्यानात ठेऊन वैज्ञानिक तत्वांवर आधारित स्थायी पद्धतीने विकासाला उत्तेजन देणे.

अधिसूचना 2011 सी.आर.झेड.चे चार वर्गात वर्गीकरण करतेः सी.आर.झेड.1 (आर्थिक दृष्टीने संवेदनशील क्षेत्र), सी.आर.झेड.2 (पक्की घरे बांधलेले क्षेत्र), सी.आर.झेड.3 (मुलतः ग्रामीण क्षेत्र), सी.आर.झेड.4 (जल क्षेत्र, यात सीमावर्ती जल क्षेत्राचा व भरतीमुळे प्रभावी जल क्षेत्राचा समावेश आहे).

## 2. किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचना 2011 व किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचना 1991 यांमध्ये मुख्य फरक कोणते आहेत?

- **सीमावर्ती जल क्षेत्राचा समावेशः** संपूर्ण जल क्षेत्र - सीमावर्ती जल क्षेत्र व 12 मैलापर्यंतचे समुद्री जल क्षेत्र तसेच खाड्या, नद्या व नदीमुखाच्या क्षेत्रासारख्या भरतीमुळे प्रभावी जल क्षेत्रांना अधिसूचना 2011 च्या खाली आणले गेले आहे.

- **बेटांसाठी वेगळी अधिसूचनाः** अंदमान, निकोबार व लक्षद्विप यारखी बेट क्षेत्रे व त्यांच्या सीमेपर्यंतची जलक्षेत्रे या अधिसुचनेच्या हद्दीत येत नाहीत. या क्षेत्रांसाठी वेगळी बेट संरक्षण क्षेत्र अधिसूचना जाहीर केली आहे.

- **धोक्याची रेषाः** मासेमारी समुदायांचे जीवन, उपजिविका व त्यांच्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी भरती, समुद्री लाटा, समुद्राच्या पातळीतील वाढ व किनाऱ्यांवरील फरक ध्यानात ठेऊन धोक्याच्या रेषेचा मुद्दा नव्याने सुरू केला आहे. किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांमध्ये' (सी.झेड.एम.पी.) धोक्याची रेषा दाखविली गेली पाहिजे. या अधिसुचनेनुसार त्या त्या सी.आर.झेड.मध्ये समुद्री किनारपट्टीच्या संदर्भात धोक्याची रेषा व भरतीरेषेपासून 500 मिटरपर्यंतच्या जमिनीच्या क्षेत्राचासुद्धा समावेश केलेला असून भरतीच्या प्रभावाखाली येणाऱ्या जल क्षेत्रांच्या बाबतीत धोक्याची रेषा व 100 मिटरपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश केलेला आहे, याचाच अर्थ असा झाला की सी.आर.झेड. क्षेत्र हे किनारपट्टीपासून 500 मिटरपेक्षा जास्तसुद्धा असू शकते (भरतीच्या प्रभावाखाली येणाऱ्या जल क्षेत्रांच्या बाबतीत हे क्षेत्र 100 मिटरपर्यंत असू शकते).

- **विशेष लक्ष देण्याची गरज असलेले क्षेत्रः** 1991 च्या अधिसुचनेत संपूर्ण किनारपट्टीसाठी एकाच प्रकारचे नियम होते. 2011 अधिसूचनेत पर्यावरणाचे व सामाजिक मुद्दे ध्यानात ठेऊन बृहन्मुंबई, केरळ व गोव्याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

  विशेष धोका असलेल्या किनारपट्टींच्या क्षेत्रांचा (सी.व्ही.सी.ए.) वेगळा वर्ग करण्यात आला असून या वर्गात पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986 नुसार पश्चिम बंगालमधील सुंदरबन व भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्र मोडतात.

- **एस.इ.झेड. ला परवानगी नाहीः** 2011 अधिसुचनेनुसार सी.आर.झेड. क्षेत्रांमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रांना (एस.इ.झेड.) परवानगी नाही.

- **मंजुरीची प्रक्रियाः** 1991 अधिसूचनेत सी.आर.झेड. मंजुरी मिळविण्याच्या पद्धती व कालमर्यादा दिलेल्या नव्हत्या. शिवाय यात मंजुरी मिळविण्याच्या प्रार्थनापत्रांचा नमुनासुद्धा नव्हता. 2011 अधिसुचनेत कालमर्यादेसह मंजुरी मिळविण्याच्या पद्धती दिलेल्या आहेत.

- **अंमलबजावणीवर देखरेखः** नियमांचे उल्लंघन तर होत नाही हे तपासण्यासाठी **2011** अधिसुचनेत अंमलबजावणीवरील देखरेखीची यंत्रणा अधिक सक्षम केलेली आहे. शिवाय यात मंजुरी-पश्चात देखरेखीच्या यंत्रणा स्पष्टपणे नमुद केलेल्या आहेत.

- **पारदर्शिकताः** जनतेची मते जाणून घेऊन पारदर्शिकता वाढविण्यासाठी **2011** अधिसुचनेत काळजी घेतलेली आहे.

- **धूप होण्याचा धोका असलेली क्षेत्रे ओळखणेः** मानवी हस्तक्षेपामुळे किनारपट्टीच्या क्षेत्रांमध्ये धूप अनुभवास येत असल्यामुळे **2011** अधिसुचनेत या क्षेत्रांच्या विस्तृत शास्त्रीय अभ्यासांचा प्रस्ताव मांडला आहे, जेणेकरून अधिक धूप होणाऱ्या किनापट्टींवर विकासाचे नियमन करता येण्यासाठी या क्षेत्रांचे 'अधिक धूप होणारे क्षेत्र' , 'मध्यम धूप होणारे क्षेत्र' व 'कमी धूप होणारे क्षेत्र' किंवा 'तटस्थ क्षेत्र' असे वर्गिकरण करता येईल.

- **विशिष्ट उद्दिष्टांसाठी ना-विकास क्षेत्राच्या नियमात (एन.डी.झेड.) शिथीलताः** काही विशिष्ट परिस्थितींमध्ये किनारपट्टींवरील पारंपारिक कोळ्यांना, विशेषतः मासेमारी करणाऱ्या समुदायांना एन.डी.झेड.च्या **100** ते **200** मिटरच्या अंतरात घरे बांधणीस/पुनर्बांधणीस परवानगी देण्याची तरतूद केलेली आहे.

## 3. 2011 अधिसुचनेतील अशा महत्वाच्या अवघड समस्या कोणत्या आहेत, ज्यांच्याबाबत आव्हान करण्याची गरज आहे?

- **किनारपट्टी क्षेत्राच्या सवलतींची गरज नसलेल्या संस्थांना त्या सवलतींची परवानगी दिली गेली आहेः** मुंबईमधील हरित क्षेत्र विमानतळ व अणु उर्जा प्रकल्पांसारख्या किनारपट्टींशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या व किनारपट्टींच्या सवलतींची गरज नसलेल्या संस्थांना **2011** अधिसुचनेनुसार या सवलतींची परवानगी अजुनही मिळत आहे.

- **आधारस्तंभांवरील रस्त्यांना किंवा स्तंभांना परवानगी आहेः** आधारस्तंभांवरील रस्ते किंवा स्तंभ म्हणजे काय हे स्पष्ट न करता सी.आर.झेड.च्या क्षेत्रात यांची तरतूद केलेली आहे. अशा अस्पष्ट तरतुदीमुळे गैरवापराला वाव असतो व भूगर्भशास्त्रीय दृष्टीने नाजूक असलेल्या किनारपट्टींच्या क्षेत्रात दृतगतिमार्ग व उड्डाणपुलांसारख्या मोठ्या प्रकल्पांना परवानगी दिली जाऊ शकते. अशा परवानगी चेन्नई व मुंबईमध्ये दिल्या गेल्याचे आढळून आले आहे.

- **केंद्रिय व राज्य पातळीवरील "किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणात (CZMAs)" मध्ये मासेमारी समुदायांचे प्रतिनिधित्व नाहीः** केंद्रिय व राज्य पातळीवरील "किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणात (CZMAs)" मध्ये मासेमारी समुदायांच्या प्रतिनिधित्वाची तरतूद नाही. अशा प्रकारच्या प्रतिनिधित्वाची मागणी खूप आधीपासून मासेमारी समुदायांच्या संस्थांडून

होत होती. वास्तविकतः हे समुदाय सर्वाधिक संख्येतील लाभार्थी असून आपल्या किनारपट्टींवरील नैसर्गिक स्त्रोतांचे स्वाभाविक रखवालदार आहेत व यांना किनारपट्टींच्या व्यवस्थापनात कायदेशीर भूमिका बजावण्यापासून वंचित ठेवले आहे.

या अधिसुचनेद्वारे स्थानिक पारंपारिक समुदायांना, विशेषतः कोळ्यांना जिल्हा न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली बनवलेल्या जिल्हा स्तरावरील समितींमध्ये प्रतिनिधित्व करण्याची तरतूद असून या समितिंचे मुख्य कार्य अधिसुचनेवरील देखरेखीत व अंमलबजावणीत मदत करणे हे आहे.

- **ना-विकास क्षेत्रात (एन.डी.झेड.) घरे बांधणीस/पुनर्बांधणीस परवानगी देण्याची तरतूद अडचणीची आहेः** सी.आर.झेड.3 मध्ये काही विशिष्ट परिस्थितींमध्ये किनारपट्टींवरील समुदायांना, विशेषतः कोळ्यांना, विशेषतः मासेमारी करणाऱ्या समुदायांना ना-विकास क्षेत्रात (100 ते 200 मिटरच्या अंतरात) घरे बांधणीस/पुनर्बांधणीस परवानगी देण्याची तरतूद ही अडचणीची आहे. किनारपट्टींवरील सर्व पारंपारिक समुदायांना ही तरतूद लागू केल्याने या अधिसुचनेत अनेक पळवाटा निर्माण होतात, जेणेकरून या तरतुदीचा गैरवापर केला जाऊ शकतो व त्यामुळे इमारतींच्या संख्या वाढून एन.डी.झेड. व सी.आर.झेड.3 क्षेत्रांमधील किनारपट्टींवरील स्त्रोतांवर ताण वाढू शकतो. मासेमारी समुदायांच्या संस्थांनी अशा परवानगीचा वापर मासेमारी समुदायांना त्यांच्या व्यवसायामुळे किनारपट्टींवरच रहावे लागत असल्यामुळे त्यांच्या घरांच्या विस्तारासाठी इतर ठिकाणी जागा उपलब्ध नाही केवळ अशाच अपरिहार्य बाबतीत केलेला आहे.

- **विशेष धोका असलेल्या किनारपट्टींच्या क्षेत्रांची (सी.व्ही.सी.ए.) तरतूद समस्याप्रधान ः** विशेष धोका असलेल्या किनारपट्टींच्या क्षेत्रांच्या (सी.व्ही.सी.ए.) तरतुदीचा प्रस्तावामुळे स्थानिक पातळीवरील समितिंमध्येसुद्धा वरच्या स्तरावरील व्यवस्थापनाला लक्ष घालावे लागत आहे व यामुळे स्थानिक समुदायांच्या भूमिका मर्यादित होतात. आणि म्हणूनच मासेमारी समुदायांच्या संस्थांनी त्याऐवजी "समुदाय व्यवस्थापन करीत असलेल्या समिती" (सी.एम.सी.ए.) स्थापन केल्या आहेत.

- **मुंबईत झोपडपट्टींचा पुनर्विकासः** मुंबईसाठी दिलेल्या विशेष सवलतीनुसार वाढिव चटई क्षेत्रासह झोपडपट्टींच्या पुनर्विकासाला परवानगी दिली गेली आहे. अति धोका असणाऱ्या क्षेत्रांमधील झोपडपट्टींच्या पुनर्ववसनाला व समुद्राची पातळी वाढण्याचा धोका असणाऱ्या दाटदाटीने घरे असणाऱ्या क्षेत्राला परवानगी देण्यामागे कोणता तर्क आहे, हा खरे तर मोठा प्रश्नच आहे. वाढिव चटई क्षेत्रामागे झोपडपट्टीमध्ये रहाणाऱ्या लोकांचा फायदा व्हावा हा उद्देश नव्हता, तर यातून उपलब्ध झालेल्या अतिरिक्त सदनिका बाहेरच्या लोकांना विकून खासगी बिल्डर्सचा फायदा व्हावा हा उद्देश होता. अशा प्रकारच्या तरतुदीमुळे मुंबईच्या किनारपट्टीवर इमारतींच्या बांधकामांचे प्रमाण खूप जास्त वाढण्याची शक्यता आहे.

- **'स्थानिक पर्यावरणावरील परिणामाचे आकलन' (ई.एल.आय.) करण्याची तरतूद नाही ः** 2011 च्या अधिसुचनेत वैयक्तिक प्रकल्पाला परवानगी देण्यासाठी आधारभूत असलेल्या 'स्थानिक पर्यावरणावरील परिणामाचे आकलन' (ई.एल.आय.) मोजण्याची तरतूद नाही. खरे म्हणजे त्या त्या क्षेत्राची क्षमता ध्यानात ठेऊन अस्तित्वात असलेल्या व प्रस्तावित अशा निरनिराळ्या प्रकल्पांचे पर्यावरणावरील परिणाम लक्षात घ्यावयास हवे होते.

- **'किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांमध्ये' (सी.झेड.एम.पी.) वारंवार सुधारणा ः 2011** अधिसुचनेद्वारे 'किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांमध्ये पाच वर्षांनंतर (किंवा त्यापेक्षाही कमी काळानंतर) सुधारणांची परवानगी आहे. मासेमारी कामगारांनी या योजनांध्ये दहा वर्षांनंतर सुधारणा व्हाव्यात अशी मागणी केली होती कारण किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांमध्ये वारंवार केलेल्या सुधारणांमुळे किनारपट्टी क्षेत्रांचे पुनर्वर्गिकरण होण्याचा व त्यायोगे नियामक यंत्रणा कमकुवत होण्यास वाव असतो.

  **पुनर्क्षेत्रीकरण पुर्वीप्रमाणेच शक्य आहे** ः एक संबंधित समस्या अशी आहे की किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे( सी.झेड.एम.ए.) प्रस्ताव जमा करून सी.आर.झेड.**3** क्षेत्रांचे (विशेषतः ग्रामीण क्षेत्रांचे) सी.आर.झेड.**2** क्षेत्रांमध्ये (बांधकामाचे असे क्षेत्र, जेथे बांधकामासाठी व विकासासाठी खूप कमी नियम आहेत) पुनर्वर्गिकरणाची मागणी करणे अजुनही शक्य आहे. **2011** अधिसुचनेच्या बाबतीत सी.आर.झेड.**3** क्षेत्रांचे सी. आर. झेड.**2** क्षेत्रांमध्ये पुनर्वर्गिकरणाच्या बऱ्याच प्रस्तावांना मंजुरी मिळाली व त्यामुळे किनारपट्टींवर बांधकामांची गर्दी वाढली आणि या अधिसुचनेचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. यामुळे जेथे अशा प्रकारच्या प्रस्तावांचे परिक्षण केले जाते अशा राज्य/संघराज्य स्तरावरील किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणामध्ये मासेमारी समुदायांचे प्रतिनिधित्व किती म्हत्वाचे आहे ही गोष्ट अधोरेखीत होते.

## 4. 2011 अधिसुचनेत मासेमारी समुदायांसाठी फायदेशीर अशा कोणत्या तरतुदी आहेत?

**2011** अधिसुचनेतील काही तरतुदी मासेमारी समुदायांसाठी फायदेशीर ठरू शकतील अशा आहेत व मासेमारी समुदायांनी या तरतुदी समजून घेणे आवश्यक आहे.

### निर्णय-प्रक्रियेत मासेमारी समुदायांचे प्रतिनिधित्व

- **जिल्हा पातळीवरील प्रतिनिधित्व** ः **2011** अधिसुचनेद्वारे स्थानिक पारंपारिक समुदायांना, विशेषतः कोळ्यांना जिल्हा न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली बनवलेल्या जिल्हा स्तरावरील समितींमध्ये प्रतिनिधित्व करण्याची तरतूद असून या समितिंचे मुख्य कार्य अधिसुचनेवरील देखरेखीत व अंमलबजावणीत मदत करणे हे आहे *[परिच्छेद 6, (क)]*. देखरेख व

अंमलबजावणी या दोन्ही जवाबदाऱ्या प्रामुख्याने राज्य/संघ राज्य पातळीवरील 'किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांची' (सी.झेड.एम.ए.) आहे.

## योजना आखण्यात मासेमारी समुदायांचा सहभाग

- **'किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजना प्रक्रियांमध्ये' (सी.झेड.एम.पी.) भाग घेणे ः 2011** अधिसुचनेनुसार किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजना मंजूर होण्याआधी या योजना बनविण्याच्या विविध स्तरांवर सल्ला मसलतींच्या प्रक्रियांमधून गेल्या पाहिजेत. किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजना प्राधिकरणांनी या योजनांच्या मसुद्यांवर लाभार्थींची मते घेणे आवश्यक आहे *[परिच्छेद 5, (2), (6), (7), (8); पुस्ती 1, परिच्छेद 4]*. यामुळे किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजना आखण्यामध्ये मासेमारी समुदायांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळते.

  'किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांनी' (सी.झेड.एम.पी.) मासेमारी गावे व मासेमारी समुदाय त्यांच्या उदरनिर्वाहासाठी व इतर गरजा भागविण्यासाठी वापरत असलेल्या सामुदायिक गुणधर्मांना *[परिशिष्ट 1 परिच्छेद 2, (7)]* नकाशांवर दाखविले पाहिजे. सी.झेड.एम.पी. त्यांच्या नकाशांवर वास्तविक भूभाग दाखवित आहे या गोष्टीची खात्री करण्याची ही मासेमारी समुदायांना संधी आहे. शिवाय जेव्हा इतर संस्था मासेमारी समुदायांना हुसकावून त्यांची जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत असताना हे समुदाय सी.झेड.एम.पी.चा वापर त्यांचे हित जपण्यासाठी करून घेऊ शकतात.

- **मासेमारी गावांसाठी योजना आखणे** ः परिशिष्ट 1 मधिल किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजना सी.झेड.एम.पी.) बनविण्यासाठीच्या मार्गदर्शिकांनुसार राज्य सरकारने किनारपट्टींवरील मासेमारी समुदायांसाठी दूरगामी निवासाच्या गरजांसाठी सविस्तर योजना बनविल्या पाहिजेत. या योजना बनविताना राज्य सरकारने विस्तारीकरण व इतर गरजा, स्वच्छतेसह इतर मूलभूत सेवा पुरविणे, सुरक्षा व नैसर्गिक संकटांसाठी तयारी यासारख्या बऱ्याच गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत. मासेमारी समुदायांनी त्या त्या राज्य/संघ राज्य सरकारसोबत काम करून त्यांच्या गावांच्या नियोजित विकासासाठी व त्यांच्या निवासाच्या सुधारणांसाठी या योजनांची अंमलबजावणी होत असल्याची खात्री केली पाहिजे *[परिशिष्ट 1 परिच्छेद 2, (7)]*.

## मासेमारी समुदायांसाठी निवासाच्या व संबंधित सोयी

- **रहात्या घरांना नियमित (अधिकृत) करणे** ः सी.आर.झेड. 1991 अधिसूचनेनुसार ज्या घरांना परवानगी होती, परंतु त्यांना अद्याप औपचारिक मंजुरी मिळालेली नव्हती, अशा घरांना पुढिल अटींसह नियमित (अधिकृत) केले जाईल ः 1) जर त्या घरांचा वापर व्यावसायिक कामांसाठी केला जात नसेल तर, व 2) जर ती घरे अपारंपारिक किनारपट्टी समुदायांना विकली किंवा हस्तांतरित केली गेली नसतील तर *[ परिच्छेद 6, (ड)]*. ही तरतूद मासेमारी समुदायांसाठी फायदेशीर असू शकते.

- **रहात्या घरांची पुनर्बांधाणी/दुरूस्ती** ः त्या त्या सी.आर.झेड.मधील स्थानिक समुदायांच्या, विशेषतः कोळ्यांच्या रहात्या घरांच्या पुनर्बांधाणीला व दुरूस्तीला स्थानिक नगर व ग्रामिण योजनांच्या नियमांनुसार परवानगी देण्यात आली आहे *[परिच्छेद 3, (इ)]*.

- **सी.आर.झेड.3 मध्ये 200 ते 500 मिटरच्या अंतरातील रहात्या घरांची बांधणी / पुनर्बांधणी** ः पारंपारिक अधिकारांच्या व सांप्रदायिक वापरांच्या आवाक्यातील **200** ते **500** मिटरच्या अंतरातील रहात्या घरांच्या बांधणी/पुनर्बांधणीसाठी परवानगी आहे, अशीच परवानगी **1991** अधिसूचनेतसुद्धा होती. रहात्या घरांच्या बांधणी/पुनर्बांधणीसाठीची परवानगी स्थानिक नगर व ग्रामिण योजनांच्या नियमांनुसार असेल व दोन मजल्यांच्या (तळमजला व पहिला मजला) घरांना जास्तीत जास्त **9** मिटरपर्यंत बांधायाची परवानगी असेल *[परिच्छेद 8, 3(सी.आर.झेड. 3), ब (7)]*. तथापि अशा बांधणी/पुनर्बांधणीसाठी इतर नियम शिथिल केले आहेत. 'नव्याने बांधलेल्या घरांची संख्या अस्तित्वात असलेल्या घरांच्या संख्येपेक्षा दुप्पट नसेल तर व सर्व घरांनी व्यापलेली जागा एकूण भूखंडाच्या आकारमानाच्या **33** टक्क्यापेक्षा जास्त नसेल तरच अशी परवानगी देण्यात येईल' या अटीला **2011** अधिसुचनेनुसार फाटा देण्यात आला आहे.

- **सी.आर.झेड.3 मधील एन.डी.झेड. मध्ये शिथिलता** ः एन.डी.झेड.ना पारंपारिक किनारपट्टी समुदायांना, विशेषतः कोळ्यांना **100** व **200** मिटरच्या अंतरात रहात्या घरांच्या बांधणीस/पुनर्बांधाणीस परवानगी देता यावी यासाठी एन.डी.झेड.मध्ये शिथिलता आणण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ही परवानगी आपात्कालीन व्यवस्थापनाच्या व स्वच्छतेच्या सर्व तरतुदी ध्यानात ठेऊन पारंपारिक किनारपट्टी समुदायांशी, विशेषतः कोळ्यांशी सल्ला मसलत करून राज्य/संघ राज्य सरकारने मंजूर केलेल्या सर्वसमावेशक योजनेवर आधारित असायला हवी *[परिच्छेद 8, 3(सी.आर.झेड. 3), अ (2)]*. तथापि आधी सांगितल्याप्रमाणे एन.डी.झेड. शिथिलता आणण्यामध्ये **100** व **200** मिटरच्या अंतरात अवाजवी बांधकामाचा धोका आहे.

- **एन.डी.झेड. मधील सोयी** ः **2011** अधिसुचनेनुसार सी.आर.झेड. **3** मधील एन.डी.झेड. मध्ये स्थानिक मासेमारी समुदायांसाठी सोयी उपलब्ध करून देण्यास परवानगी आहे, जसे मासे सुकविण्याच्या जागा, जाळे दुरूस्तीच्या जागा, लिलाव भवन, पारंपारिक नौका बनविण्याच्या जागा, बर्फाच्या लाद्या बनविण्याचे प्लँट, बर्फाचा चुरा करण्याची यंत्रे, मासे टिकविण्याच्या सोयी आणि यासारख्या इतर सोयी *[परिच्छेद 8, 3(सी.आर.झेड. 3), अ (3)(ल)]*.

  सी.झेड.एम्.ए.द्वारे स्थानिक रहिवाशांसाठी लागणाऱ्या सोयींनासुद्धा परवानगी आहे, जसे, औषधालये, शाळा, सार्वजनिक पर्जन्य निवारा, सार्वजनिक शौचालये, पुल, रस्त्यांचे बांधकाम,

पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा, गटारे, दफनभूमि, स्मशानभूमि, इलेक्ट्रिक सब-स्टेशन सारख्या सोयी *[परिच्छेद **8, 3**(सी.आर.झेड. **3**), अ (**3**)(ज)]*.

- **मुंबईतील कोळीवाड्साठी विशेष तरतूद** ः बृहन्मुंबईसाठी केलेल्या विशेष तरतुदीनुसार मुंबई तील कोळीवाड्यांनासद्धा नकाशात स्थान दिले जाऊन त्यांना सी.आर.झेड. **3** म्हणून घोषीत केले जाईल. पुढे मासेमारी समुदायांच्या रहात्या घरांच्या पुनर्बांधणीस व दुरूस्तीस प्राधान्य देऊन परवानगी देण्यात येईल. ही तरतूद मुंबईतील मासेमारी समुदायांना त्यांच्या पारंपारिक जागेबाबतच्या अधिकाराचे जतन करण्यास उपयुक्त ठरू शकते. ही तरतूद मासेमारी गावांसाठी दूरगामी विकासाच्या योजना बनविण्याच्या तरतुदीसोबत जोडली गेल्यास कोळीवाड्यांसाठी झोपडपट्टी विकासाच्या नियमाखाली न येता त्यांच्या क्षेत्राचा विकास करून घेण्याची संधी मिळते.

## माहिती उपलब्ध होणे

- **माहिती उपलब्ध होणे** ः **2011** अधिसुचनेनुसार सी.झेड.एम.पी., मंजुरी, अनुसरण अहवाल, उल्लंघन, उल्लंघनांविरूद्ध केलेली कारवाई व सी.आर.झेड.शी संबंधित न्यायालयीन आदेश यासंबंधीची सर्व माहिती जनतेसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. सी.आर.झेड.विषयी माहिती संबंधित सी.झेड.एम.ए.ला अर्ज लिहून उपलब्ध झाली पाहिजे. प्रत्येक राज्यातील/संघराज्यातील सी.झेड.एम.ए.ने आपापले संकेतस्थळ उघडून त्यावर केवळ वरील माहितीच नव्हे, तर त्यांच्या बैठकींमधील एजंडा, त्या बैठकींमध्ये घेतलेले निर्णय व दिलेल्या मंजुरी याविषयीची माहिती उपलब्ध केली पाहिजे. अशी माहिती उपलब्ध केली आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी व या माहितीचा उपयोग करून घेण्यासाठी प्रत्येक राज्याच्या/संघराज्याच्या संकेतस्थळांवर लक्ष ठेवणे महत्वाचे आहे *[परिच्छेद **4.2, (6)**]*.

## प्रदुषण व किनाऱ्यावरील पाण्याच्या तसेच पर्यावरणाच्या अवनतिवर नियंत्रण ठेवणे

- सी.आर.झेड. **4** मध्ये किनाऱ्यापासून **12** मैलाच्या अंतरावरील जलक्षेत्राचा व भरतीमुळे प्रभावित होणाऱ्या जलक्षेत्राचा समावेश होतो. ही अधिसूचना या क्षेत्रांमधील पर्यावरणाला धोका असणाऱ्या कृतिंचे नियम करते. उदा. प्रक्रिया न केलेला कचरा, सांडपाणी, नौकांमधील सांडपाणी, जलप्रक्रियेसह सर्व प्रकारच्या कृतिंमधून निघणारी राख किंवा कचरा टाकण्यावर बंदी आहे. सी.आर.झेड. **4** मधील तेल व वायु स्फोट व ड्रीलिंग, खाणकाम, नौका बांधणैचे काम यामुळे होणाऱ्या प्रदुषणाचे नियमन केले पाहिजे *[परिच्छेद **8, 4**(अ) व (ब)]*.

  कारखाने, नगर, शहरे व वस्त्यांमधून प्रक्रिया न केलेला कचरा व सांडपाणी समुद्रात टाकून देण्याच्या अस्तित्वात असलेल्या सवयी ही अधिसूचना लागू झाल्याच्या तारखेपासून (**06** जानेवारी **2011**) दोन वर्षांच्या कालावधीत हळुहळू बंद होत असल्याची खात्री किनारपट्टी असलेल्या सर्व राज्यांनी केली पाहिजे. पुढे घन कचरा (बांधकामातील राडारोडा, राख, इ.) टाकणे ही अधिसूचना लागू होण्याच्या एक वर्षाच्या कालावधीत बंद झाले पाहिजे.

मासेमारी समुदायांसाठी प्रदुषण व किनारपट्टींवरील पाण्याचे तसेच पर्यावरणाचे दुषित होणे हे महत्वाचे असल्यामुळे या तरतुदीवर अंमलबजावणी झाल्यास ही तरतूद खूप उपयुक्त ठरू शकते. मासेमारी समुदायांनी अशा प्रकारच्या प्रदुषणावर व कचरा फेकण्यावर लक्ष ठेवून अशा बावी सर्वांच्या लक्षात आणून देण्यात महत्वाची भूमिका पार पाडली पाहिजे.

## 5. उल्लंघन होत आहे की नाही हे बघण्यात मासेमारी समुदाय कशा प्रकारे भूमिका बजावू शकतात?

भारतातील सर्व किनारपट्टींवर मासेमारी समुदाय पसरलेला आहे. त्यांना किनारपट्टींवर व जलक्षेत्रात होणाऱ्या कृतिंची माहिती असते. किनारपट्टींवरील पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी सी.आर.झेड. **2011** अधिसुचनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणे हे मासेमारी समुदायांच्या हिताचे आहे. **1991** अधिसुचनेच्या कमकुवत अंमलबजावणीमुळे किनारपट्टींवर बरीच बेकायदेशीर बांधकामे झाली, त्यामुळे मासेमारी समुदायांच्या जीवनावर व उपजिविकेवर बराच परिणाम झालेला आहे हे सर्वश्रूत आहे. हे असे पुन्हा होऊ नये यासाठी मासेमारी समुदायांनी नेहमी दक्ष रहायला पाहिजे.

सी.आर.झेड. **2011** अधिसुचनेमधील महत्वाच्या तरतुदींची माहिती मासेमारी समुदायांना असणे खूप महत्वाचे आहे. त्यांनी एस.सी.झेड.एम.ए.कडून किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांचीसुद्धा (सी.झेड.एम.पी.) माहिती घेतली पाहिजे. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की **2011** अधिसुचनेनुसार नव्या योजना मंजूर होईपर्यंत **1991** अधिसुचनेनुसार बनलेल्या योजनांचे पालन केले पाहिजे.

### सी.आर.झेड.1, 2, 3 (किनारपट्टी क्षेत्र) मधील उल्लंघन

समुदायांनी त्या त्या सी.आर.झेड.मध्ये (ते क्षेत्र सी.आर.झेड.**1, 2** किंवा **3** आहे की नाही हे लक्षात घेऊन) उभ्या रहाणाऱ्या मोठ्या प्रकल्पांविषयी किंवा बांधकामांविषयी दक्ष रहायला पाहिजे. एखादी कृति **2011** अधिसुचनेचे उल्लंघन करीत असल्याची शंका आल्यास खालीलपैकी बरीच पावले उचलता येऊ शकतात ः

- त्या प्रकल्पाची जास्तीत जास्त माहिती मिळवा, जसे कंपनीचे नाव, सरकारी विभागाची/कार्यालयाची माहिती, किंवा व्यक्तिचे नाव, नेमके ठिकाण (सर्व्हे नंबर), इ.
- या प्रकल्पाला सी.झेड.एम.ए.ची मंजुरी आहे की नाही हे तपासून पहा. **2011** अधिसुचनेनुसार त्या त्या राज्याच्या/संघराज्याच्या सी.झेड.एम.ए. नी त्यांच्या संकेतस्थळावर सर्व प्रकल्पांना दिलेल्या मंजुरीचीची माहिती देणे आवश्यक आहे. जर अशी मंजुरीची माहिती संकेतस्थळावर दिलेली नसेल तर ती माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करण्याविषयी संबंधित सी.झेड.एम.ए.शी संपर्क साधा.

- जर मंजुरी दिलेली नसेल, दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, जर तो प्रकल्प बेकायदेशीर असेल तर लगेच राज्य/संघराज्य सरकारच्या किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे व पर्यावरण व वन मंत्रालयाकडे तक्रार नोंदवा आणि याची प्रत एन.एफ.एफ. सचिवाकडे पाठवा.
- त्या प्रकल्पाला दिलेल्या मंजुरीचे उल्लंघन होण्याची शक्यता आहे. म्हणून त्या मंजुरीची एक प्रत मिळवणे व ती तपासून बघणे महत्वाचे आहे. जर मंजुरी
- जर मंजुरी सी.आर.झेड.अधिसुचनेचे (सी.झेड.एम.पी. बघा) उल्लंघन करून दिली आहे आणि तो प्रकल्प किनारपट्टींच्या पर्यावरणावर भूगर्भशास्त्रीय परिणाम करेल अशी शंका असेल तर तुमचे म्हणणे अधिक ठोसपणे मांडण्यासाठी प्रकल्पाचे स्वरूप, प्रकल्पाचे अस्तित्वात असलेले/संभाव्य परिणाम, उल्लंघनाचे छायाचित्र, गुगल अर्थची मदत घेऊन त्या प्रकल्पाचे नेमके ठिकाण, इत्यादिसारखी जास्तीत जास्त माहिती गोळा करा, जेणेकरून तुम्ही उल्लंघनाचे स्वरूप योग्य रितीने मांडू शकाल.
- सर्व तक्रारी राज्य/संघराज्य सरकारच्या किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे व पर्यावरण व वन मंत्रालयाकडे पाठवा आणि त्याच्या प्रति एन.एफ.एफ. सचिवाकडे पाठवा. संबंधित पत्ते परिशिष्टामध्ये दिलेले आहेत.
- संबंधित सी.झेड.एम.ए.कडून, ग्राम पंचायत किंवा नगपालिकांकडून आणि पर्यावरण व वन मंत्रालयाकडून एखादी माहिती मिळवण्यात अडचण येत असल्यास ती माहिती माहितीच्या अधिकाराचा वापर करून मिळवत येऊ शकते.

## सी.आर.झेड.4 (सीमावर्ती जलक्षेत्र व भरतीमुळे प्रभावी जलक्षेत्र) मधील उल्लंघन

मासेमारी समुदायांनी किनारपट्टीवरील पाण्यात कचरा टाकण्याविषयी व प्रदुषणाविषयी खूप दक्ष रहायला हवे. अशा सर्व बाबी (विशेषतः छायाचित्र, गाड्यांचे नंबर, नौकांची किंवा बोटींची नावे, नेमके ठिकाण, इत्यादिसारखी जास्तीत जास्त माहितीसह) राज्य/संघराज्य सरकारच्या किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या तसेच पर्यावरण व वन मंत्रालयाच्या निदर्शनास आणून दिल्या पाहिजेत.

## सी . आर . झेड . 1991 अधिसुचनेचे उल्लंघन

पर्यावरण व वन मंत्रालयाने **25** जानेवारी **2011** रोजी किनारपट्टी असलेल्या सर्व राज्य/संघराज्य सरकारच्या किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांना पर्यावरण (संरक्षण) कायदा, **1986**च्या (सूचना क्रमांक **11-83/2005-1**अ**-3**, दिनांक **25/01/2001**) भाग **5**नुसार खालील आदेश दिलेत ः

(अ) हा आदेश जारी झाल्यानंतर चार महिन्यांच्या आत त्यांच्या हद्दीतील **1991** किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचनेचे व त्यानुसार मान्यताप्राप्त किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन योजनांचे उल्लंघन ओळखा;

(ब) त्यानंतर चार महिन्यांच्या आत ओळखलेल्या उल्लंघनांवर पर्यावरण (संरक्षण) कायदा, **1986**च्या नुसार कारवाई सुरू करा;

(क) ओळखलेल्या उल्लंघनांचे, वरील (अ) व (ब) नुसार केलेल्या कारवाईचे सविस्तर विवरण दर दोन आठवड्यांनी संकेतस्थळावर प्रकाशित करा .

गेल्या दोन दशकात झालेले उल्लंघन अधोरेखित करण्याची व राज्य/संघराज्य सरकारच्या किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणांच्या व पर्यावरण व वन मंत्रालयाच्या जबाबदारीची मागणी करण्याची ही एक संधी आहे .

सध्याच्या उल्लंघनांविषयी शक्य तितकी जास्तीत जास्त माहिती (वर सांगितल्याप्रमाणे) मिळविण्याचा प्रयत्न करा व तावडतोब किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे व पर्यावरण व वन मंत्रालयाकडे तक्रार नोंदवा, तसेच एन . एफ . एफ . सचिवाकडे त्याच्या प्रति पाठवा .

*परिशिष्ट*

महत्वाची संकेतस्थळे व पत्ते

संकेतस्थळे

सरकारी कार्यालये :

राष्ट्रीय स्तर ः पर्यावरण व वन मंत्रालय

www.moef.nic.in

http://envfor.nic.in/legis/crz.htm

http://moef.nic.in/modules/others/?f=press-releases

http://moef.nic.in/modules/public-information/orders-guidelines/

राज्य स्तर ः

| | |
|---|---|
| गुजरात ः | http://gujenvfor.gswan.gov.in/e-citizen/e-citizen-clearances.htm |
| दमण व दिव ः | www.daman.nic.in |
| महाराष्ट्र ः | http://mczma.maharashtra.gov.in/ |
| | http://envis.maharashtra.gov.in/ |
| | http://envis.maharashtra.gov.in/envis_data/?q=mczma_s |
| कर्नाटक ः | http://parisara.kar.nic.in/ |
| केरळ ः | http://www.kerenvis.nic.in/kczma/ |
| तामिळनाडू ः | http://www.tnenvis.nic.in/crz_noti_coastal.htm |
| पाँडेचरी ः | http://dste.puducherry.gov.in/PCZMAHOME.htm |
| पश्चिम बंगाल ः | http://wbsczma.gov.in/ |
| | http://enviswb.gov.in/ |

<u>पत्ते</u>

| | |
|---|---|
| पर्यावरण व वन मंत्रालय प्रमुख कार्यालय व क्षेत्रिय कार्यालये | <u>दक्षिण क्षेत्र, बंगळुरू</u><br>श्री. के.एस. रेड्डी<br>प्रधान वन संवर्धन अधिकारी (केंद्र)<br>केंद्रिय सदन, **4** था मजला,<br>इ.व एफ. विंग, ब्लॉक **2** कोरमंगला,<br>बंगळुरू - **560034**<br>दूरध्वनी क्रमांक - **080-25537184**<br>फॅक्स - **080-25537184**<br><br><u>पूर्व क्षेत्र, भुवनेश्वर</u><br>श्री. जे.के. तिवारी<br>प्रधान वन संवर्धन अधिकारी (केंद्र)<br>अ/**3**, चंद्रशेखरपुर,<br>भुवनेश्वर - **751023**<br>दूरध्वनी क्रमांक - **0674-2301213**<br>फॅक्स - **0674-2302432**<br><br><u>पश्चिम क्षेत्र, भोपाळ</u><br>श्री. ए.के. राणा<br>प्रधान वन संवर्धन अधिकारी (केंद्र)<br>केंद्रिय पर्यावरण भवन,<br>लिंक रोड क्रमांक **3**,<br>भोपाळ - **462016**<br>दूरध्वनी क्रमांक - **0755-2465494** |
| केंद्रिय किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण | अध्यक्ष, केंद्रिय किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, पर्यावरण भवन, सी.जी.ओ. कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली - **110003** |

<u>राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण</u>

| | |
|---|---|
| गुजरात | अध्यक्ष, गुजरात राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान सचीव, वन व पर्यावरण विभाग, ब्लॉक क्रमांक **14**, **8**वा मजला, सचिवालय, गांधीनगर-**382010**. |

| | |
|---|---|
| | सदस्य सचीव, गुजरात राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व संचालक, वन व पर्यावरण विभाग, ब्लॉक क्रमांक **14**, **8**वा मजला, सचिवालय,<br>गांधीनगर-**382010** |
| दमण व दिव | अध्यक्ष, दमण व दिव किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रशासक, दमण व दिव, दमण-**396210**<br>उप वन संवर्धक, उप वन संवर्धक कार्यालय, दमण व दिव प्रशासन, दमण-**396210** |
| महाराष्ट्र | अध्यक्ष,<br>महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण,<br>पर्यावरण विभाग,<br>**15**वा मजला, नवी प्रशासनीय इमारत, मंत्रालयासमोर,<br>मॅडम कामा रोड,<br>मम्बई-**400020**<br><br>सदस्य सचीव, महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण,<br>पर्यावरण विभाग, उप सचीव,<br>**15**वा मजला, नवी प्रशासनीय इमारत, मंत्रालयासमोर,<br>मॅडम कामा रोड,<br>मम्बई-**400020** |
| गोवा | अध्यक्ष, गोवा राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान सचीव, पणजी, गोवा .<br><br>सदस्य सचीव, गोवा राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, गोवा सरकार, विज्ञान, तंत्र व पर्यावरण विभाग,<br>सालीगाओ सेमिनरीसमोर, सालीगाओ, गोव-**403511** . |
| कर्नाटक | अध्यक्ष, कर्नाटक राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान सचीव, वन, भूगर्भशास्त्र व पर्यावरण विभाग, कर्नाटक सरकार,<br>मल्टीस्टोरिड बिल्डिंग, के.जी.रोड,<br>बंगळुरू - **560001**<br><br>सदस्य सचीव, कर्नाटक राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व संचालक, पर्यावरण तंत्र सेल, वन, भूगर्भशास्त्र व पर्यावरण विभाग, कर्नाटक सरकार,<br>मल्टीस्टोरिड बिल्डिंग, के.जी.रोड,<br>बंगळुरू - **560001** |
| केरळ | अध्यक्ष,<br>केरळ राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण,<br>शास्त्र भवन, पट्टम, |

| | |
|---|---|
| | थिरूअनंतपुरम - **4**<br><br>सदस्य सचीव, केरळ राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व संचालक, शास्त्र, तंत्र व पर्यावरण परिषद,<br>शास्त्र भवन, पट्टम,<br>थिरूअनंतपुरम - **4** |
| लक्षद्विप | अध्यक्ष, लक्षद्विप किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रशासक, लक्षद्विप संघराज्य प्रशासन,<br>कावरट्टी - **682555**<br><br>सदस्य सचीव, प्रदुषण नियंत्रण मडळ व लक्षद्विप किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण,<br>लक्षद्विप संघराज्य प्रशासन,<br>कावरट्टी - **682555** |
| तामिळनाडु | अध्यक्ष, तामिळनाडु राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान सचीव, पर्यावरण व वन विभाग,<br>पहिला मजला, पानगल बिल्डिंग,<br>साईदापेट, चेन्नई - **600015**<br>तामिळनाडु<br><br>सदस्य सचीव, तामिळनाडु राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व संचालक, पर्यावरण विभाग, तामिळनाडु सरकार,<br>तळमजला, पानगल बिल्डिंग,<br>साईदापेट, चेन्नई - **600015**<br>तामिळनाडु |
| पाँडेचरी | अध्यक्ष, पाँडेचरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान सचीव, शास्त्र, तंत्र व पर्यावरण विभाग व हाऊसिंग बोर्ड,<br>पाँडेचरी - **605001**<br><br>सदस्य सचीव, तामिळनाडु राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व संचालक, शात्र, तंत्र व पर्यावरण विभाग व हाऊसिंग बोर्ड,<br>पाँडेचरी - **605001** , |
| अंदमान व निकोबार बेटे | अध्यक्ष, अंदमान व निकोबार किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान वन संवर्धक, अंदमान व निकोबार बेटे प्रशासन,<br>चथम, पोर्ट ब्लेअर - **744102** |

| | |
|---|---|
| | वन संवर्धक, व सदस्य सचीव, अंदमान व निकोबार किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, अंदमान व निकोबार बेटे प्रशासन,<br>चथम, पोर्ट ब्लेअर - **744102** |
| आंध्र प्रदेश | अध्यक्ष, आंध्र प्रदेश राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व अतिरिक्त प्रधान सचीव, आंध्र प्रदेश सरकार, पर्यावरण, वन, विज्ञान व तंत्र विभाग,<br>सचिवालय, हैद्राबाद - **500022**<br><br>सदस्य सचीव, आंध्र प्रदेश राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, आंध्र प्रदेश सरकार, पर्यावरण, वन, विज्ञान व तंत्र विभाग,<br>सचिवालय, हैद्राबाद - **500022** |
| ओरिसा | अध्यक्ष, ओरिसा राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व प्रधान सचीव, विज्ञान, तंत्र व पर्यावरण व वन विभाग, ओरिसा सचिवालय,<br>भुवनेश्वर - **751001**<br><br>सदस्य सचीव, ओरिसा राज्य किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण व संचालक, विज्ञान, तंत्र व पर्यावरण व वन विभाग, ओरिसा सचिवालय,<br>भुवनेश्वर - **751001** |
| पश्चिम बंगाल | अध्यक्ष, सचीव, पर्यावरण विभाग, पश्चिम बंगाल सरकार, रायटर्स बिल्डिंग, जी ब्लॉक, दुसरा मजला,<br>कोलकाटा - **700001**<br><br>सदस्य सचीव, पश्चिम बंगाल प्रदुषण नियंत्रण मडळ व सदस्य सचीव, पश्चिम बंगाल किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, परिवेश भवन,<br>**10** अ, ब्लॉक एल.ए., सेक्टर **3**,<br>सॉल्ट लेक सिटी,<br>कोलकाटा - **700001** |

**नॅशनल फिशवर्कर्स फोरमच्या (एन.एफ.एफ.) संपर्क व्यक्तीचा पत्ता ः**


श्री. प्रदीप चॅटर्जी

**20/4** सील लेक,

कोलकाटा,

पश्चिम बंगाल,

भारत.

ई-मेल ः pradipdisha@gmail.com


www.coastalcampaign.page.tl


Nandurbar
Dhule
Jalgaon
Amravati
Nagpur
Gondiya
Bhandara
Akola
Wardha
Buldana
Nashik
Washim
Yavatmal
Chandrapur
Aurangabad
Thane
Hingoli
Gadchireli
Jalna
Ahmadnagar
Mumbai (Suburban)
Mumbai
Parbhani
Bid
Nanded
Pune
Osmanabad
Raigarh
Latur
Solapur
Satara
MAHARASHTRA
Ratnagiri
Sangli
Kolhapur
Sindhudurg